https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २३० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. १३ आक्टोंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६



सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❏ वर्षे - ३ रे ❏ अंक - २३० वा ❏ अमरावती (महाराष्ट्र) ❏ सोमवार दि. १३ आक्टोंबर २०२५ ❏ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❏ मुल्य - १ रु. ❏ पृष्ठ -६


# आर. एस. एस. सांस्कृतिक शक्ती, देशभक्त संघटना

## मुख्यमंत्री फडणवीस यांची काँग्रेसवर टीका; स्थानिकच्या निवडणुकीत शक्य तिथे युती करण्याचे संकेत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती –** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही एक सांस्कृतिक शक्ती व देशभक्त संघटना आहे. त्यामुळे या संघटनेवर बंदी घालण्याची मागणी करणाऱ्यांकडे आम्ही ढुंकूणही पाहत नाही, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संघावर बंदी घालण्यासंबंधी काँग्रेसने केलेली मागणी धुडकावून लावली आहे.

केरळच्या तिरुवनंतपुरम येथील एका २६ वर्षीय अभियंत्याने ९ ऑक्टोबर रोजी आत्महत्या करून आपली जीवनयात्रा संपवली. तत्पूर्वी, एका सुसाईड नोटमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शिबिरात झालेल्या लैंगिक शोषणामुळे आपण हे टोकाचे पाऊल उचलत असल्याचा दावा त्यांनी केला आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांचे सुपुत्र प्रियांक खरगे यांनी कर्नाटक सरकारकडे एका पत्राद्वारे संघावर बंदी घालण्याची मागणी केली आहे. या पार्श्वभूमीवर देवेंद्र फडणवीस यांनी वरील शब्दांत ही मागणी धुडकावून लावली आहे.

**काँग्रेस अध्यक्षांच्या मुलावर निशाणा–** देवेंद्र फडणवीस म्हणाले, कर्नाटकचे नेते प्रियांक खरगे प्रसिद्धीसाठी



असल्या गोष्टी करत असतात. त्यांना कोणताही आधार नाही. ते आपल्या वडिलांच्या भरवशावर राजकारण करणारे नेते आहेत. मी त्यांना एवढेच सांगू इच्छितो की, यापूर्वी अनेकदा संघावर बंदी घालण्याचा प्रयत्न झाला किंबहुना बंदीही घालण्यात आली. ज्या इंदिरा गांधींनी संघावर बंदी घातली, त्यांना सत्तेतून पायउतार व्हावे लागले. त्यामुळे संघ एक सांस्कृतिक शक्ती आहे. एक देशभक्त संघटना आहे. राष्ट्रीय विचारांनी प्रेरित मूल्याधिष्ठित अशा प्रकारच्या मानवनिर्मितीचे कार्य संघ करतो. त्यामुळे प्रसिद्धीसाठी पत्र लिहिणाऱ्यांकडे आम्ही ढुंकूणही पाहत नाही.

**यावेळी बोगस मतदान चालणार नाही–** अमरावती विभागात मागच्या निवडणुकीत १४ हजारांहून अधिक बोगस मतदान झाले आहे.

पत्रकारांनी याकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले. त्यावर ते म्हणाले, अशा प्रकारची तक्रार आमच्याकडे आली आहे. आमच्या लोकांनीही निवडणूक आयोगाकडेही तक्रार केली आहे. आम्ही यावेळी लक्ष ठेवून आहोत. यावेळी अशी खोटी मते नोंदवून निवडणूक लढवता येणार नाही, असे ते ठणकावण्याच्या सूरात म्हणाले

### भाजप निवडणुकांसाठी सज्ज

मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शक्य आहे तिथे महायुतीमधील मित्रपक्षांसोबत युती करण्याचे संकेत दिले. ते म्हणाले, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी संपूर्ण महाराष्ट्रात विभागनिहाय आमचे दौरे लावलेत. राज्यात लवकरच महापालिका, जिल्हा परिषद, नगरपालिका, नगरपंचायतीच्या निवडणुका आहेत. या निवडणुकांचा आढावा घेण्यासाठी या बैठका लावण्यात आल्यात. आम्ही यापूर्वी मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, कोकण, पश्चिम महाराष्ट्र या ४ विभागांचा आढावा घेतला. आता अमरावती विभागाचा आढावा घेतला जात आहे. मुंबई विभागाचा आढावा पुढल्या आठवड्यात घेतला जाईल. एकूणच कार्यकर्त्यांची मानसिक तयारी चांगली आहे. निवडणुकीसाठी भाजप पूर्णपणे सज्ज आहे.

### युती करण्याचा निर्णय स्थानिक पदाधिकाऱ्यांवर

युती करण्याचा मुद्दा आम्ही खालच्या पातळीवर सोडला आहे. पण जिथे शक्य आहे, तिथे युती केली पाहिजे अशा प्रकारचे निर्देश देण्यात आलेत. विशेषतः एखाद्या ठिकाणी युती झाली नाही तरी मित्र पक्षांवर टीका करू नये अशी सूचना करण्यात आली आहे. माझ्या मते, महायुती म्हणून चांगले यश आमच्या तिन्ही पक्षांना मिळेल. काही कार्यकर्त्यांनी स्वबळावर निवडणूक लढवण्याचा आग्रह धरला आहे. पण अशी मागणी नेहमीच होत असते. पण त्या – त्या ठिकाणच्या परिस्थितीचा विचार करून निर्णय घ्यायचा असतो. केवळ सर्वांना निवडणूक लढता यावी म्हणून आपल्याला अशा प्रकारचा निर्णय घेता येत नाही. त्यामुळे जिथे शक्य आहे तिथे युती केली पाहिजे. जिथे शक्य नाही तिथे समोरासमोर लढले जाईल, असे फडणवीस म्हणाले.

# खासदार संजय राऊत यांची तब्येत बिघडली

## मुंबईच्या फोर्टिस रुग्णालयात केले दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३मुंबई –** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांची तब्येत अचानक बिघडल्यामुळे त्यांना मुंबईतील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, खासदार संजय राऊत यांना भांडुप येथील फोर्टिस रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. त्यांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना तातडीने रुग्णालयात नेण्यात आले आहे.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, खासदार राऊत यांनी काही दिवसांपूर्वी याच फोर्टिस हॉस्पिटलमध्ये त्यांच्या रक्त तपासण्या करून घेतल्या होत्या. प्रकृती बिघडल्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून त्यांना रुग्णालयात डमिट करण्यात आले आहे. राऊत यांच्या तब्येतीबद्दल सध्या अधिकृत माहिती समोर आलेली नाही. खासदार संजय राऊत यांना यापूर्वी हृदयविकाराचा त्रास झाला आहे आणि त्यांच्यावर अँजिओप्लास्टी शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, खासदार राऊत यांनी काही दिवसांपूर्वी याच फोर्टिस हॉस्पिटलमध्ये त्यांच्या रक्त तपासण्या करून घेतल्या होत्या. प्रकृती बिघडल्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून त्यांना रुग्णालयात डमिट करण्यात आले आहे. राऊत यांच्या तब्येतीबद्दल सध्या अधिकृत माहिती समोर आलेली नाही. खासदार संजय राऊत यांना यापूर्वी हृदयविकाराचा त्रास झाला आहे आणि त्यांच्यावर अँजिओप्लास्टी शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

### यापूर्वी दोन अँजिओप्लास्टी...

**पहिली अँजिओप्लास्टी:** राऊत यांच्यावर नोव्हेंबर २०१९ मध्ये पहिल्यांदा अँजिओप्लास्टी करण्यात आली होती. त्यावेळी त्यांना छातीत हलका त्रास जाणवत होता. ही शस्त्रक्रिया लीलावती रुग्णालयात झाली होती आणि त्यांच्या हृदयात दोन 'स्टेंट्स' बसवण्यात आले होते.

**दुसरी अँजिओप्लास्टी:** त्यानंतर डिसेंबर २०२० मध्ये त्यांच्यावर पुन्हा एकदा अँजिओप्लास्टीची शस्त्रक्रिया करण्यात आली होती. यामध्ये आणखी 'स्टेंट्स' बसवण्यात आले होते, कारण आधी बसवलेल्या स्टेंट्सपैकी एकामध्ये पुन्हा ब्लॉकेज आढळला होता. ही शस्त्रक्रियासुद्धा लीलावती रुग्णालयात करण्यात आली होती.

# शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात जाणार नाही!

## चंद्रशेखर बावनकुळे यांचं आश्वासन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३नागपूर** अतिवृष्टीचा फटका झेलणाऱ्या शेतकऱ्यांच्या मदतीसाठी सरकारकडून हरतऱ्हेने प्रयत्न करण्यात येत आहे. सरकारने अगोदरच ३२ हजार कोटींचे पॅकेज जाहीर केले आहे. शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात जाणार नाही यादृष्टीनेच पावले उचलण्यात येत असल्याचे प्रतिपादन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. रविवारी ते नागपुरात प्रसारमाध्यमांशी बोलत होते.राज्याला व्हिजन २०३५ आणि २०४७ ची दिशा देणारे हे सरकार केवळ घोषणांवर नाही, तर प्रत्यक्ष कृतीवर विश्वास ठेवते. शेतकरी संकटात असताना सरकारने चर्चांपेक्षा प्रत्यक्ष कृतीवर भर दिला. राजकारणात नेतृत्व हे केवळ पदावरून नव्हे, तर कृतीतून सिद्ध होते. महाराष्ट्राच्या सध्याच्या राजकीय परिदृश्यात ही रेषा



अधिक स्पष्ट दिसत आहे, असे बावनकुळे म्हणाले.

सोमवारी नागपुरात मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत नागपूर-अमरावती विभागीय बैठक होणार आहे. या बैठकीत शेतकरी पॅकेजचा अंमल, महसूल-कृषी यंत्रणेचे समन्वय आणि आगामी निवडणुकांची तयारी यावर चर्चा होणार होईल, अशी माहिती बावनकुळे यांनी दिली.यावेळी त्यांनी परत एकदा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर टीकास्त्र सोडले. उद्धव ठाकरे हतबल मुख्यमंत्री होते, तर देवेंद्र फडणवीस हे सक्षम नेतृत्व देणारे नेते आहेत. फडणवीस हे प्रशासन आणि जनसंपर्क या दोन्ही आघाड्यांवर सक्रिय असतात, तर ठाकरे यांनी शासनकाळ काचेच्या घरात घालविल्याचा आरोप त्यांनी केला.

# मुख्यमंत्री फडणवीस यांच्या बैठकीसाठी महाविद्यालयाला सुट्टी!

## काँग्रेसची कायदेशीर कारवाईची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती–** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत बडनेरा येथील प्रो. राम मेघे अभियांत्रिकी महाविद्यालयात सोमवारी भाजपच्या पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीसाठी चक्क महाविद्यालयाला सुट्टी देण्यात आल्याचा आरोप युवक काँग्रेसने केला आहे. शिक्षण संस्थेच्या आवारात राजकीय कार्यक्रम घेणे आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान करणे, हा नियमभंग असल्याचा दावा करत युवक काँग्रेसने कायदेशीर कारवाईची मागणी केली आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज अमरावती दौऱ्यावर होते. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था आणि अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या तयारीसाठी ही बैठक आयोजित करण्यात आली होती. मात्र, ही बैठक पक्ष कार्यालयात न घेता, विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीच्या प्रो. राम मेघे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या आवारात घेण्यात आली. याच कारणामुळे आता ही बैठक वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे.



युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष अक्षय साबळे यांनी अशा प्रकारच्या राजकीय बैठकीच्या आयोजनावर टीका केली आहे. विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटी ही एक प्रतिष्ठित शिक्षण संस्था आहे. या संस्थेच्या प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या आवारात थेट भाजपचा राजकीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला. भाजपच्या शहर अध्यक्षांनी त्यांच्या पदाचा गैरवापर करत महाविद्यालयाला सुट्टी दिली आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान केले आहे, असे साबळे म्हणाले. स्वतःच्या राजकीय फायद्यासाठी विद्यार्थ्यांना सुट्टी देत त्यांचे शैक्षणिक नुकसान करण्यात आले. इतकेच नव्हे तर व्यवस्थापनाने संस्थेच्या कर्मचाऱ्यांचा वापरही राजकीय कार्यक्रमासाठी केला. महाविद्यालयाच्या आवारातील हा कार्यक्रम पूर्णपणे बेकायदेशीर आहे. हे 'एआयसीटीई' आणि 'यूजीसी'च्या नियमांचे उल्लंघन आहे. त्यामुळे त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी युवक काँग्रेसच्यावतीने अक्षय साबळे यांनी केली आहे.

# राहुल गांधींच्या 'मत चोरी'च्या आरोपांवर SIT चौकशीची मागणी सुप्रीम कोर्टाने फेटाळली

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३नवी दिल्ली –** सर्वोच्च न्यायालयाने काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांची 'वोट चोरी'च्या आरोपासंदर्भातील याचिका सोमवारी फेटाळून लावली आहे. या याचिकेत बेंगळूरू मध्य मतदारसंघातील २०२४ च्या लोकसभा निवडणुकीतील मतदार यादीत फेरफार झाल्याच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथक स्थापन करण्याची मागणी करण्यात आली होती.

न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने याचिकाकर्ते रोहित पांडे यांना त्यांच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी भारतीय निवडणूक आयोगाकडे जाण्यास सांगितले आहे.



या याचिकेच्या सुनावणीवेळी खंडपीठाने म्हटले, आम्ही याचिकाकर्त्याच्या वकिलांचे म्हणणे ऐकले आहे. कथितपणे सार्वजनिक हितासाठी दाखल केलेल्या या याचिकेवर सुनावणी घेण्याकरिता आम्ही इच्छुक नाही. जर सल्ला दिला गेला असेल तर, याचिकाकर्ता निवडणूक आयोगाकडे (एउख) दाद मागू शकतो.पांडे म्हणाले की, त्यांना हजारो अवैध आणि बनावट नोंदी आढळल्या आहेत आणि हे घटनात्मक हमीच्या मुळावर घाव घालते आणि कलम ३२४ चे उल्लंघन करते.

तसेच याचिकाकर्त्याने न्यायालयाकडे असे निर्देश देण्याची विनंती केली की, मतदारयाद्यांची पुढची पडताळणी किंवा त्यांना अंतिम स्वरूप देण्याचे काम तोपर्यंत केले जाऊ नये जोपर्यंत स्वतंत्र ऑडिट पूर्ण केले जात नाही.

# ..तर मग महाविद्यालयांविरुद्ध लागेल ॲट्रॉसिटी !

## आदिवासी विकास विभागाकडून शैक्षणिक संस्थांना कडक निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३नागपूर –** महाविद्यालयाकडून पात्र अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कागदपत्रांची अडवणूक व विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचे शिक्षण शुल्क वसूल करू नये, अशी तक्रार प्राप्त झाल्यास संबंधित व महाविद्यालयांविरोधात आदिवासी विकास विभाग शासन निर्णय अन्वये संबंधित शैक्षणिक संस्था महाविद्यालयांच्या विरुद्ध फौजदारी स्वरूपाची कार्यवाही करण्यात येईल. तसेच, अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ अन्वये (ॲट्रॉसिटी) कारवाई करण्यात येईल, असा इशारा प्रकल्प अधिकारी नितीन ईसोकर यांनी दिला आहे.आदिवासी विकास विभागाकडून



२०१८-१९ या आर्थिक वर्षापासून अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व परीक्षा शुल्क या योजनेअंतर्गत महाडीबीटी प्रणालीमार्फत देण्यात येत आहे. सद्यस्थितीत महाडीबीटी प्रणालीवरील पीएफएमएस या प्रणालीद्वारे शिष्यवृत्तीचे निधी वितरण सुरू आहे. विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम आधार जोडलेल्या बँक खात्यात जमा करण्यात येत आहे. ही प्रणालीद्वारे रक्कम पीएफएमएस वितरीत होत असल्याने नोंदणी केलेल्या अर्जामध्ये आधार क्रमांक अद्ययावत नसणे, आधार क्रमांक त्यांच्या बँक खात्याशी संलग्न नसणे, आधार क्रमांक सक्रिय नसणे, विद्यार्थ्यांनी व्हाऊचर रौडीम न करणे, आधार जोडणी असलेले बँकेतील खाते बंद असणे, आधार जोडलेले मोबाइल क्रमांक बंद असणे, दुसऱ्या हप्त्यासाठी महाविद्यालय स्तरावर विद्यार्थ्यांची उपस्थिती अद्ययावत करण्यासाठी अर्ज प्रलंबित असणे, या सर्व बाबी विद्यार्थ्यांच्या आधार, बँक खात्याशी निगडित असल्याने या कारणांमुळे विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती प्रलंबित आहे किंवा कसे, याबाबत महाविद्यालयाने खातरजमा करून विद्यार्थ्यांच्या तक्रारींचे तातडीने निराकरण करण्याची जबाबदारी महाविद्यालयाची राहणार आहे.

## संपादकीय ......

# यंदा साखर 'गोड'!

अतिवृष्टीचा फटका इतर पिकांच्या तुलनेने उसाला कमी बसल्याने मुबलक पाण्याने उतारा वाढण्याची शक्यता असून, गतवर्षीच्या तुलनेत गळीत हंगामाला अधिक काळ मिळणार असल्याने उस उत्पादक शेतकर्यांना साखर अधिक गोड लागण्याची शक्यता आहे; मात्र शेतकर्यांना चांगला दर मिळण्याबरोबरच विक्री दरातही योग्य वाढ करण्याची मागणी साखर उद्योगातून होत आहे. राज्यात पावसाने मे महिन्याच्या दुसर्या आठवड्यापासून सर्वदूर लावलेली हजेरी, त्यानंतरही सलग चार महिन्यांहून अधिक काळ झालेली अतिवृष्टी खरिपातील पिकांसाठी बहुतांश नुकसानीची राहिली. तुलनेने नदीलगतची शेती सोडता इतर सर्व भागातील उस क्षेत्रास फारसा फटका बसलेला नाही. उलट अनेक ठिकाणी उतारा चांगला राहणार आहे.

गतवर्षी २०० साखर कारखान्यांनी ऊस गाळप हंगाम घेतला. त्यांनी ८५५.१० लाख टन उसाचे गाळप पूर्ण करून प्रत्यक्षात शेतकर्यांना ऊसतोडणी, वाहतूक खर्चासह एफआरपीचे सुमारे ३१ हजार ३०१ कोटी रुपये देण्यात आले. साखरेचे सुमारे ८०.९४ लाख टन इतके उत्पादन हाती आले; मात्र साखर कारखाने जेमतेम ८५ ते ९० दिवसच सुरू राहिले. कारण, उसाची कमी उपलब्धता आणि २०० साखर कारखान्यांची मिळून दैनिक ऊस गाळप क्षमता सुमारे ९ लाख ७० हजार टन इतकी राहिली. त्यामुळे गाळप हंगामाचे कमी होणारे दिवस ही साखर उद्योगासाठी धोक्याची घंटा म्हणावी लागेल. पूर्वी ऊस गाळपाचे दिवस १४० ते १६० दिवसांच्या आसपास असायचे. याचाच अर्थ उसाचे वाजवी क्षेत्र महत्त्वाचे ठरते. त्यासाठी दरवर्षी किमान १४ लाख हेक्टर क्षेत्राहून अधिक ऊस पीक गरजेचे आहे. शिवाय हेक्टरी ऊस उत्पादकता किमान शंभर टनांपर्यंत राहावी, यासाठी साखर कारखान्यांचा ऊस विकास कार्यक्रमही महत्त्वाचा म्हणावा लागेल; मात्र अलीकडे घटत चाललेली उत्पादकता, ही खरी चिंतेची बाब आहे. त्यावर विचारमंथन जसे आवश्यक आहे, तसेच ही घट थांबवण्यावर उपाययोजनाही गरजेच्या आहेत.

यंदाच्या म्हणजे २०२५-२६ या हंगामाचे एक वेगळे वैशिष्ट्य राहील, ते म्हणजे खासगी कारखान्यांची संख्या आता सहकारी साखर कारखान्यांपेक्षा अधिक आहे. यंदा ऊस गाळप परवान्यांसाठी प्राप्त प्रस्तावांमध्ये सहकारी १०४ आणि खासगी १०७ मिळून २११ कारखान्यांनी यंदा ऊस गाळप परवाना मिळविण्यासाठी अर्ज केले. प्रत्यक्षात साखर आयुक्तालयाने निश्चित केलेल्या निकष, अटी व शर्तींनुसार किती कारखाने सुरू होतील, हे महिनाभरात स्पष्ट होईल. ती किमान दोनशेच्या वर राहण्याची अपेक्षा आहे. दिवाळीनंतर ऊस गाळप हंगाम सुरू होण्यामुळे ऊसतोड मजुरांची उपस्थिती हंगामाच्या सुरुवातीपासून चांगली राहील. त्यामुळे ऊसतोड वेळेत होण्यासही मदत होईल.

यंदाच्या हंगामातील उपलब्ध उसाची स्थिती तुलनात्मकदृष्ट्या अधिक असल्याने हंगाम सरासरी १०० ते ११० दिवस राहण्याची अपेक्षा आहे. राज्यात या हंगामामध्ये इथेनॉलकडे सुमारे २० लाख टन साखर जाईल, असे गृहित धरण्यात आले आहे. त्यातून यंदा उसाचे क्षेत्र राज्यात १४ ते १६ लाख हेक्टर इतके आहे. सरासरी ऊस उत्पादकता प्रतिहेक्टरी ७६ ते ७८ टन राहील. प्रत्यक्षात गाळपासाठी ९५० ते १,०५० लाख टन ऊस उपलब्ध होऊन कृषी विभागाच्या माहितीनुसार साखरेचे उत्पादन हे ८५ लाख टन, तर 'मिटकॉन' संस्थेच्या आकडेवारीनुसार ते ९६ लाख टन राहण्याचा अंदाज आहे. याचाच अर्थ गेल्या वर्षीच्या तुलनेत साखरेचे उत्पादन अधिक होणार, ही चांगली बाब ठरते. मागणी आणि पुरवठा याचे नियमन करताना सरकारची कसोटी लागणार आहे. ग्राहक तसेच ऊस उत्पादक दोघांचेही समाधान कसे करणार, हा मोठा प्रश्न आहे.

साखर उद्योगाशी संबंधित बहुतांश साखर संघटनांनी केंद्र सरकारकडे विविध मागण्या केल्या आहेत. साखर उद्योगाने महत्त्वाच्या प्रश्नांवर केंद्राचे लक्ष वेधून घेत दिलासा देण्याची मागणी वारंवार केली आहे. त्यामुळे हा विषय केंद्रस्थानी येणार, हे स्पष्ट आहे. चालू वर्षीसाठी जाहीर करण्यात आलेल्या एफआरपीचा बेसिक दर हा १०.२५ टक्के उतार्यासाठी ३,५५० रुपये आहे. म्हणजेच गतवर्षीपेक्षा एफआरपीच्या दरात एकीकडे वाढ झालेली असताना साखर विक्रीचा प्रतिक्विंटलचा विक्रीचा दर मात्र ३,१०० रुपये क्विंटलच ठेवण्यात आलेला आहे. याचा थेट फटका साखर कारखान्यांना, त्यायोगे शेतकर्यांना बसणार आहे. एफआरपी दरात वाढ होत असली, तरी ऊस उत्पादन आणि वाहतूक खर्च वाढत आहे. त्यामुळे प्रतिकिलोस साखरेचा विक्री दर ३१ रुपये असताना उत्पादन खर्च प्रतिकिलोस ४१ रुपये येत आहे.किमान तेवढा दर तरी केंद्राने विक्रीसाठी निर्धारित करण्याची साखर उद्योगाची अपेक्षा आहे. त्यावर अनेक वर्षे निर्णयच होत नसल्याने साखर उद्योगात थोडा निराशेचा सूर आहे. केंद्राला सादर केलेल्या प्रस्तावात याबाबतची सर्व माहिती साखर कारखाना महासंघाने दिली आहे. केंद्र सरकारने इथेनॉल उत्पादनास प्रोत्साहन दिलेले आहे. दुसरीकडे सी हेवी मळीपासून उत्पादित इथेनॉलचे दर वाढविण्यात आले. तुलनेने बी हेवी मळी आणि सिरपपासूनच्या इथेनॉल दरात प्रतिलिटरला पाच रुपयांनी दरवाढ करण्याची साखर उद्योगाची मागणी आहे. याशिवाय देशांतर्गत गरज भागवून केंद्राने साखर निर्यातीला पुन्हा प्राधान्य देण्याची मागणी होत आहे. चालूवर्षी किमान २० लाख टन साखर निर्यातीस केंद्राने हिरवा कंदील दाखविण्याची आवश्यकता आहे. कृषिमूल्य आयोग उत्पादन खर्चाचा विचार करून केंद्र सरकारला उसाच्या एफआरपीबाबत अहवाल देत असते. या सर्व मागण्यांचा वस्तुस्थितीदर्शक विचार होऊन केंद्राने गाळप हंगाम सुरू होण्यापूर्वी म्हणजे दि. १ नोव्हेंबरपूर्वी या सर्व विषयांबाबत सकारात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता साखर उद्योगातून बोलून दाखविली जात आहे. केंद्राच्या या 'गुड न्यूज'कडे साखर उद्योगाचे डोळे लागले आहेत.

# पॉलीहाऊसमध्ये 'ही' पिके सर्वात जास्त नफा मिळवून देतील? जाणून घ्या सविस्तर



पॉलीहाऊसमधील शेती

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक ३ कृषी**

आपल्या देशातील बहुतेक शेतकरीशेतीला फायदेशीर व्यवसाय म्हणून पाहू लागले आहेत. अलीकडे पॉलीहाऊस मधील शेतीला प्राधान्य मिळू लागले आहे. पॉलीहाऊस शेतीच्या माध्यमातून चांगले उत्पन्न मिळवता येते. पॉलीहाउसमध्ये कोणकोणती पिके घेता येतील, ज्याद्वारे चांगले उत्पन्न मिळू शकेल, जाणून घेऊयात...

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

पॉलीहाऊस ही शेतीची एक आधुनिक पद्धत आहे. लोखंड, जीआय पाईप किंवा बांबूपासून एक रचना तयार केली जाते आणि त्यावर एक पारदर्शक प्लास्टिक शीट ठेवली जाते. पारदर्शक प्लास्टिक सूर्यप्रकाश मुक्तपणे आत प्रवेश करू देते. पॉलीहाऊस तंत्रज्ञान सुरक्षित शेती मानले जाते. पॉलीहाऊसमध्ये पिके घेतल्याने कीटक, रोग, अवकाळी पाऊस, जास्त सूर्यप्रकाश, थंड वारे आणि जास्त पाण्यापासून संरक्षण होते.

पॉलीहाऊसमध्ये कोणती पिके घ्यावीत?

पॉलीहाऊसमध्ये शेती करणाऱ्या लोकांना हे माहित असले पाहिजे की भात, गहू, ज्वारी आणि बाजरी ही पिके आत घेतली जात नाहीत. पॉलीहाऊसचा वापर नगदी पिके आणि बागायती पिकांसाठी केला जातो. कमी कालावधीची पिके घेता येतात. ज्यामध्ये प्रामुख्याने गुलाब, जरबेरा, कार्नेशन आणि ग्लॅडिओलस सारखी फुले घेतली जातात. शिवाय वाटाणे, काकडी, सिमला मिरची आणि वांगी यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, फळे, मसाले आणि औषधी वनस्पतींची लागवड केल्याने मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळते.

**या गोष्टी लक्षात ठेवा**

पॉलीहाऊस ही एक आधुनिक शेती तंत्र आहे, म्हणून पहिल्यांदाच त्यांचा अवलंब करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रशिक्षण घेतले पाहिजे.

ज्या ठिकाणी पॉलिहाऊस उभे करायचे आहे, अशा ठिकाणी पाण्याची सोय असायला हवी.

पॉलीहाऊस अशा ठिकाणी बांधा जिथे सूर्यप्रकाश मिळेल.

पुरेसा वायुवीजन सुनिश्चित करा; वायुवीजन नसल्यामुळे तापमान वाढेल.

शेती करण्यापूर्वी ठिबक सिंचन लावणे देखील आवश्यक आहे.

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# विषमुक्त खाद्य उत्पादनासाठी सेंद्रिय शेती काळाची गरज – कृषी तज्ञ बसैय्या हिरेमठ

## कृषी मित्र प्रतिष्ठानच्या परिसंवाद कार्यक्रमातुन कृषी विकासावर तज्ञाची वार्तालाप

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३अमरावती-** शेती व्यवसाय हा अन्नधान्य व खाद्य उत्पादनाचा मुख्य केंद्रबिंदू आहे. परंतु आजच्या बदलत्या युगात शेती सुद्धा आधुनिक पद्धतीने होत असून अनेक जैविक व रासायनिक घटकांचा वापर वाढल्याने शेती उत्पादनातील पोषण कमी झाले आहे. परिणामी विषयुक्त खाद्य हे आपल्या आरोग्यासाठी अपायकारक ठरतांना दिसत आहे. उत्तम आरोग्यासाठी पोषण खाद्य महत्वाचे असल्याने नैर्सगिक शेतीतूनच कसदार व पोषणयुक्त व आरोग्यदायी खाद्य उत्पादनाची निर्मिती होणार आहे. त्यामुळे विषमुक्त खाद्य उत्पादनासाठी सेंद्रिय शेती काळाची गरज असून शेतकऱ्यांमध्ये याबाबत जाणीव - जागृती आवश्यक असल्याचे प्रतिपादन मोरींगा शेतीतज्ञ बसैय्या हिरेमठ यांनी व्यक्त केले. कृषी मित्र प्रतिष्ठान अमरावतीच्या वतीने शनिवार दिनांक ११ ऑक्टोबर २०२५ रोजी मोर्शी रोड, अमरावती स्थित श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे कृषी परिसंवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला.यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी मित्र प्रतिष्ठान अमरावतीचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र. विधानपरिषद आमदार संजय खोडके तर प्रमुख अतिथी म्हणून अमरावती विधानसभा मतदार संघाच्या आमदार - सौ. सुलभाताई खोडके, केळी उत्पादक शेतकरी किरण डोके, श्री.शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष केशवराव मेतकर, सेव्ह द चिल्ड्रेन इंडिया मुंबईचे विभागीय समन्वयक तथा प्रसिद्ध वक्ते अनिरुद्ध पाटील ,महाऑरेंजचे अध्यक्ष श्रीधरराव ठाकरे, जिल्हास्तरीय शेतकरी सल्लागार समिती अमरावतीचे अध्यक्ष- नरेंद्र शिंगणे, जिल्हा उद्योग केंद्र अमरावतीचे सहसंचालक निलेश निकम, मार्केटिंग एक्स्पर्ट सतीश वऱ्हाडे , कृषी शास्त्रज्ञ राजेंद्र वानखडे, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी अमरावती - प्रदीप चेचरे , प्राचार्य सी.एम. देशमुख , महेंद्र गजभिये , दिनेश डागा , दीपक झंवर, आदि मान्यवर उपस्थित होते आहे. पुढे बोलतांना मोरिंगा अर्थात शेवगा शेतीतज्ञ बसैय्या हिरेमठ यांनी आपल्या नंदी ऑरगॅनिक फार्म च्या माध्यमातून सुरु असलेले शेवगा उत्पादन आणि या माध्यमातून कृषी व्यवसायाच्या संधी याबाबत मार्गदर्शन केले. एक प्रयोगशील शेतकरी ते यशस्वी कृषीउद्योजक पर्यंतचा आपला प्रवासाचा त्यांनी उलगडा केला. शेवगा हे खाद्य अत्यंत गुणकारी व आरोग्यदायी असून त्यांचे मानवी पोषणात अनेक फायदे आहे. एक औषधी म्हणूनही ते लाभदायी आहे.




या परिसंवादात मार्गदर्शन करतांना अमरावतीच्या आ.सौ. सुलभाताई खोडके म्हणाल्या कि, मराठवाडा पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत अमरावती विभागात कृषी विकासाबाबत मागासलेपण आहे. कृषी विकासासंदर्भात शेतकऱ्यांमध्ये जागृती नसल्याने शेतकरी आपल्या पारंपरिक पद्धतीने शेती व्यवसाय करत आहे. आजचे बदलते कृषी तंत्रज्ञान व संशोधन तसेच कृषी विकासाच्या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांनी जर कृषी लागवड, व्यवस्थापन व विपणन यांची सांगड घातल्यास शेती समृद्धी होणार असल्याचे प्रतिपादन आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी केले. दरम्यानकृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व शासनस्तरावर पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांचा मान्यवर अतिथींच्या हस्ते शाल,गौरवचिन्ह व शेवगा रोपटे देऊन सत्कार करण्यात आला. सत्कारमूर्तींमध्ये सौ. रजनी जयप्रकाश रावणकर , अरविंद पुरुषोत्तम तट्टे , राहुल साहेबराव उभाले, कम्युनिटी ऍक्शन फॉर रूरल डेव्हलमेंट सोसायटी (कार्ड ) अमरावती. नरेंद्र काशिनाथ शिंगणे ,विनय तुळशीराम बोथरा.,. पुष्पक श्रीरामजी खापरे, नामदेव आनंदराव वैद्य , गोपाळराव गणपतराव धुर्वे,ममता प्रमोद ठाकूर , प्रवीणदास रामदास बेलखेडे , शशीभूषण भाऊरावजी उमेकर , गजानन बारबुद्धे ,श्रीमती शांता गंगाराम धांडे आदींचा समावेश होता. अँग्रोवन चे कृषी पत्रकार विनोद इंगोले व कृषीचे रिल्स प्रसिद्ध करणारे रवींद्र काडलकर यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. आपल्या स्फूर्तीदायी व्याख्यानात प्रसिद्ध वक्ते अनिरुद्ध पाटील यांनी शेतकऱ्यांना प्रगत व आत्मनिर्भर बनविण्यासाठी तसेच कृषी व्यवसाय पुढे नेण्यासाठी आवशयक असणाऱ्या बाबींवर प्रकाश टाकून शेतकऱ्यांना गतिशील व प्रयोगशील होण्याचे आवाहन केले. तर केळी लागवड व व्यवस्थापन मध्ये संशोधन करणारे कृषी शास्त्रज्ञ किरण डोके यांनी सुद्धा फळ पिके ,लागवड तसेच विपणन याबाबत मार्गदर्शन केले. या कृषीपरिसंवादाचे प्रास्ताविक विवेक टेकाडे यांनी तर सूत्रसंचालन पवनकुमार ढोमणे यांनी तसेच आभार प्रदर्शन वीरेंद्र भोयर यांनी केले. यावेळी कृषी संलग्नित अधिकारी, शास्त्रज्ञ, संशोधक, कृषीउद्योजक व व्यावसायिक , प्रगतिशील शेतकरी , महिला शेतकरी तसेच कृषी पदवीधारक व कृषी मित्र मोठ्या संख्येने उपस्थित होते. कृषी परिसंवाद कार्यक्रमानंतर सर्वांनी स्नेहभोजनाचा लाभ घेतला.

**कृषी संवादातूनच कृषी उन्नती साधली जाईल - आ.संजय खोडके-** कृषी मित्र प्रतिष्ठान अमरावतीचे अध्यक्ष आ.संजय खोडके यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात अमरावती विभागातील शेती व शेतकरी यांच्या समोरील समस्या व आव्हाने व या संदर्भात कृषी विकासाच्या उपाययोजना करण्यांसंदर्भातील विविध पैलूंवर प्रकाश टाकला. कृषी विकासाची चळवळ पुढे नेण्याचा प्रयत्न सुरु केला केला. याकरिता कृषी पदवीधारकांचा मोठा सहभाग लाभत आहे. महाराष्ट्रात कृषी प्रगत धोरण अवलंबिले जात असून मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्राला कृषी विषयक योजनांचा लाभ मोठ्या प्रमाणावर मिळत आहे.




# ९९% युवा रात्री करतात 'ही' चूक! ज्यामुळे वाढली त्यांची झोपेची समस्या!

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक**



एक गंभीर समस्या वेगाने वाढत आहे, ती म्हणजे झोपेचे विकार उत्तम आरोग्य आणि मानसिक स्थिरतेसाठी आवश्यक असलेली शांत झोप तरुणाईच्या जीवनातून कुठेतरी हरवत चालली आहे. याचा थेट परिणाम त्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर तसेच अभ्यासावर आणि कार्यक्षमतेवर होत आहे.

एका महत्त्वपूर्ण संशोधनातून (ठश- ेशरीलह) या समस्येची गंभीर कारणे समोर आली आहेत, जी तरुणांच्या जीवनशैलीशी थेट जोडलेली आहेत:

स्क्रीनचा अतिवापर: धक्कादायक म्हणजे, जवळपास ९९ टक्के टीनएजर झोपण्यापूर्वी अगदी शेवटच्या क्षणापर्यंत मोबाईल, टॅब्लेट किंवा टीव्ही यांसारख्या स्क्रीनचा वापर करतात.

झोपण्यापूर्वी खाणे: तसेच, ६३ टक्के टीनएजर झोपायला जाण्यापूर्वी लगेच काहीतरी खातात.

या दोन प्रमुख सवयींमुळे त्यांच्या झोपेच्या गुणवत्तेवर आणि झोपेच्या वेळापत्रकावर खूप वाईट परिणाम होत आहे.

युवांच्या झोपेवर स्क्रीनचा इतका परिणाम का?

झोप न लागण्याचे सर्वात मोठे आणि आधुनिक कारण म्हणजे झोपण्यापूर्वी मोबाईल किंवा लॅपटॉपच्या स्क्रीनमधून (इश्रींश ङळसहीं) बाहेर पडणारा 'नीळा प्रकाश'

मेलाटोनिनवर परिणाम: हा नीळा प्रकाश आपल्या मेंदूला झोप येण्यासाठी आवश्यक असलेले 'मेलाटोनिन' नावाचे संप्रेरक उत्पादित करण्यापासून थांबवतो.

मेंदू सक्रिय राहतो: झोपण्यापूर्वी स्क्रीन पाहिल्याने मेंदू शांत होण्याऐवजी सतत सक्रिय (-लींळींश) राहतो. सोशल मीडियावरील अपडेट्स, व्हिडिओ किंवा गेमिंगमुळे मन उत्तेजित राहते, ज्यामुळे झोप लागण्यास जास्त वेळ लागतो आणि झोप सखोल ( लागत नाही.

झोपेचे चक्र बदलते: परिणामी, तरुणाईचे नैसर्गिक झोपेचे चक्र बिघडते. रात्री उशिरापर्यंत जागणे आणि सकाळी उशिरा उठणे, यामुळे दिवसभर थकवा जाणवतो.

रात्री खाणे झोपेसाठी धोकादायक का?

संशोधनानुसार, ६३ टक्के तरुण झोपण्यापूर्वी खातात. ही सवय झोपेच्या गुणवत्तेसाठी अत्यंत हानिकारक आहे:

पचनाचे काम: जेव्हा तुम्ही झोपायला जाता, तेव्हा तुमचे शरीर विश्रांतीच्या (ठशीींळपस) स्थितीत जायला लागते. परंतु जर तुम्ही लगेच आधी काही खाल्ले असेल, तर पचनसंस्थेला (ऊळसशीींळींश डूीींशा) ते पचवण्याचे काम करावे लागते.

ऍसिडिटी आणि अस्वस्थता: यामुळे छातीत जळजळ किंवा ऍसिडिटी होण्याची शक्यता वाढते. ही अस्वस्थता शांत झोपेत अडथळा निर्माण करते.

जास्त कॅलरी: रात्री उशिरा खाल्लेले अन्न बऱ्याचदा जड आणि जास्त कॅलरीचे असते, जे शरीरासाठी योग्य नसते.

# ५००१ अंड्यांच्या भुर्जीचा नागपुरात जागतिक विक्रम; 'वर्ल्ड रेकॉर्डस् बुक ऑफ इंडिया'मध्ये नोंद

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३नागपूर** 'वर्ल्ड एग डे २०२५' च्या निमित्ताने प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांनी ५००१ अंड्यांची भुर्जी तयार केली. 'वर्ल्ड रेकॉर्डस् बुक ऑफ इंडिया'मध्ये या विक्रमाची नोंद करण्यात आली. महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ (माफसू), नागपूर अंतर्गत नागपूर पशुवैद्यक महाविद्यालयाच्या कुक्कुट पालन शास्त्र विभागाने प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांच्या सहकार्याने रविवारी (दि.१२) हा एक आगळावेगळा उपक्रम राबवून जागतिक विक्रम प्रस्थापित केला. अंड्यांबद्दल असलेले गैरसमज दूर करून, समाजात त्यांच्या पौष्टिक मूल्यांविषयी जनजागृती करणे आणि प्रथिनयुक्त, आरोग्यदायी आहाराचा प्रसार करणे, या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

रविवारी पहाटे साडेपाच वाजता सेमीनरी हिल्स परिसरातील नागपूर पशुवैद्यक महाविद्यालयाच्या आवारात या उपक्रमाचे हवेत फुगे सोडून उद्घाटन करण्यात आले. भुर्जी तयार करण्याची प्रक्रिया सुमारे नऊ वाजेपर्यंत चालली. त्यानंतर उपस्थित मान्यवर, विद्यार्थी आणि नागरिकांना भुर्जी पावासह नि:शुल्क वितरीत करण्यात आली. हजारोच्या संख्येने जमलेले नागरिक यावेळी भुर्जीची चव घेत विश्वविक्रमाचे साक्षीदार झाले. योजना पोल्ट्री, पुणे यांच्याकडून पॉवर एग या ब्रँडची अंडी तर साई केटरर्स, नागपूर यांच्याकडून पाव उपलब्ध करून देण्यात आले.




महाचाय प्रा. लि. तर्फे सर्व उपस्थितांना चहाचे वितरण करण्यात आले. 'वर्ल्ड रेकॉर्डस् बुक ऑफ इंडिया'चे ॲडज्युरीकेटर डॉ. धीरज अग्रवाल आणि डॉ. हर्षल वऱ्हाडे उपस्थित होते. त्यांच्या पुष्टीकरणानंतर राज्यमंत्री आशिष जैस्वाल यांच्या हस्ते वर्ल्ड रेकॉर्ड सर्टिफिकेट प्रदान करण्यात आले.यावेळी पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र सिंगल, माफसूचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील, वेनकीज इंडियाचे जनरल मॅनेजर डॉ. विजय तिजारे, संचालक शिक्षण व अधिष्ठाता डॉ. एस. व्ही. उपाध्ये, संचालक विस्तार शिक्षण डॉ. एस. डब्ल्यू. बोंडे उपस्थित होते. पशुवैद्यक महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. जयंत कोरडे, समन्वयक डॉ. मुकुंद कदम यांनी पुढाकार घेतला.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. १३ ऑक्टोंबर २०२५

शहर/ग्रामिण

# ऐतिहासिक नेहरु मैदानात मनपा इमारत हलवण्यास भाजपाचा तीव्र विरोध

## मैदाने वाचली पाहिजे, ऐतिहासिक वारसा जतन व्हावा-भाजपाची स्पष्ट भूमिका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १३ अमरावती ४**

विकासाच्या गोंडस नावाखाली अमरावती शहरातील मैदाने गिळंकृत करण्याच्या कृतीला भारतीय जनता पार्टीचा तीव्र विरोध असून नेहरु मैदानाचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता ते आणि शहरातील इतर मैदाने देखील कायम ठेवण्यात यावी, अशी स्पष्ट भूमिका भाजपा नेते खा. डॉ. अनिल बोंडे यांनी आज पत्रपरिषदेत मांडली.अमरावती महानगरपालिका इमारत नेहरू मैदानात बांधून महानगरपालिकेच्या मूळ जागेवर व्यापारी संकुल बांधण्यात येणार असल्याच्या निर्णयाचे वृत्त काल प्रकाशित झाले होते. या संदर्भात आपली भूमिका स्पष्ट करण्यासाठी भाजपाच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत खा. डॉ अनिल बोंडे बोलत होते. यावेळी भाजपा



नेते प्रवीण पोटे पाटील, प्रदेश प्रवक्ते शिवराय कुळकर्णी, माजी महापौर किरणताई महल्ले प्रामुख्याने उपस्थित होते.नेहरू मैदानाला ऐतिहासिक महत्व आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात याच मैदानात अमरावतीकरांनी स्वराज्याची शपथ घेतली होती. या मैदानाचे सौंदर्यीकरण व्हावे. इथे असलेली शाळेची इमारत 'हेरिटेज' आहे. त्या इमारतीला सजवून त्यावर विविध प्रकारचे लाईट्स सोडून त्या इमारतीत अमरावतीचा इतिहास दर्शवणारे संग्रहालय व्हावे. अमरावती शहराच्या मध्यभागी छोटे का असेना एकमेव मैदान शिल्लक आहे. त्या मैदानाशी अमरावतीकरांचे भावनिक नाते जुळले आहे. अतिशय दाट वस्तीच्या मुंबईसारख्या शहरात देखील मैदानांचे संवर्धन आणि जतन करण्यात येते. अमरावतीत देखील याचप्रकारचा विचार करण्यात यावा. नेहरु मैदान, दसरा मैदान, सायन्सकोर मैदान अशा सर्व मैदानांना ऐतिहासिक महत्व असून त्यांचे जतन करण्यात यावे, अशी आग्रही मागणी भाजपाच्या वतीने करण्यात आली.

राजकमल चौकातील गजबजलेल्या जागेतून इमारत हटवून ती पुन्हा गजबजलेल्या भागातच नेण्याची कल्पना हास्यास्पद आहे. विद्यापीठ मार्गावर जागा उपलब्ध असताना नेहरू मैदानाचा बळी घेणे योग्य नसल्याचे स्पष्ट प्रतिपादन डॉ. अनिल बोंडे यांनी केले. या निर्णयाला आमचा प्रखर विरोध असून काम पडल्यास आम्ही जनआंदोलन उभारू. यासाठी आम्ही 'नेहरु मैदान बचाव कृती समिती' गठीत केली असून आम्ही अखेरपर्यंत लढा देऊ असेही पत्रकार परिषदेत स्पष्ट करण्यात आले. नेहरू मैदान संरक्षण व संवर्धनासाठी भाजपाच्या वतीने विशेष कार्यक्रम हाती घेतला जाईल, असेही यावेळी सांगण्यात आले.

# डॉक्टर कॉलनीत खळबळ!

## सोसायटीच्या नियमांना तिलांजली देत दोन प्लॉटवर उभारली जात आहे सात मजली इमारत

### अध्यक्ष, सचिवांनी पदाचा दुरुपयोग केल्याचा सदस्यांचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १३ अमरावती**

तपोवन गेटच्या आत असलेल्या डॉक्टर कॉलनी येथील राजीव को. ऑप. हाउसिंग सोसायटी येथे मोठा गैरव्यवहार उघड झाला आहे. सोसायटीचेच अध्यक्ष डॉ. हरिष गुल्हाने आणि त्यांचा मुलगा डॉ. हितेश गुल्हाने,सचिव गोवर्धन वानखडे यांनी सोसायटीच्या उपविधींचा भंग करून,व पदाचा गैरवापर करून सभासदांना कोणतीही माहिती न देता स्वतःच्या मालकीचे दोन प्लॉट आदित्य इंजिनिअर्स अँड कॉन्ट्रॅक्टर या बांधकाम फर्मला विक्री करून त्यावर अवैधरित्या सात मजली इमारत बांधकाम करण्याचे षडयंत्र सुरू असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक २९ मार्च २०२४ रोजी डॉ. गुल्हाने यांनी त्यांच्या मालकीच्या दोन प्लॉटचा व्यवहार आदित्य इंजिनिअर्स अँड कॉन्ट्रॅक्टर या फर्मशी केला. या फर्मचे भागीदार गोपाल बोंदराजी इंगळे, अक्षय बाबराव इंगळे आणि गोकुलदास राऊत असून, संबंधित जागेवर सात मजली फ्लॅट सिस्टीमचे बांधकाम मोठ्या प्रमाणात सुरू केले



आहे.परंतु सोसायटीच्या उपविधीनुसार, राजीव को. ऑप. हाउसिंग सोसायटी ही केवळ निवासी सोसायटी असून, सोसायटीच्या हद्दीत वाणिज्य उपयोग अथवा फ्लॅट सिस्टीम प्रकारचे बांधकाम करण्यास स्पष्ट मनाई आहे. तरीही अध्यक्षांनीच नियमांची पायमल्ली करत हा व्यवहार केल्याने सदस्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर सोसायटीच्या सदस्यांनी सहकार न्यायालय, अमरावती येथे दावा दाखल केला आहे. त्यानुसार, न्यायालयाने आदित्य इंजिनिअर्स अँड कॉन्ट्रॅक्टर यांना आदेश देऊन संबधीत प्लॉट वरील सुरू असलेले बांधकाम का थांबवू नये? याबाबत लेखी उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. दरम्यान, प्लॉट क्रमांक १ व २ वरील सात मजली इमारतीचे बांधकाम कायदेशीर वादात अडकलेले असल्याने, नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, त्यांनी या फ्लॅट किंवा दुकानांशी संबंधित कोणताही खरेदी-विक्री अथवा भाडे व्यवहार करण्यापूर्वी संपूर्ण कागदपत्रांची व कायदेशीर स्थितीची खात्री करूनच व्यवहार करावा असे आवाहन सोसायटीचे सदस्य साधना देशमुख, मुरलीधर घाटोळ, कृष्णाभाऊ चाटघोडे, अॅड. एस. टी. खंडारे संजय देऊळकर,राजू सायगण,अजित राठोड, श्याम इखार,शैलेश डहाके,रूथ लोखंडे यांनी संयुक्तरीत्या केले आहे.

# नेहरू मैदानाच्या जागेवर शहर विकासाचे विविध प्रकल्प जनविकासाच्या दृष्टीने सोयीचे असतांना त्याला विरोध होणे खेदजनक

## आ.संजय खोडके यांनी मांडली रोख-ठोक भूमिका

### पालकमंत्री ना.बावनकुळे यांच्या निर्देशावरूनच एमएसआयडीसी व मनपा प्रशासनाने सुचविला नेहरू मैदान येथील जागेचा पर्याय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती** - शहराच्या हृदयस्थळी असूनही अत्यंत दुर्लक्षित व दुरावस्थेत असलेल्या नेहरू मैदान येथे अमरावती महानगर पालिकेची नूतन प्रशासकीय इमारत साकारण्यात यावी, या मुद्द्यावर नुकत्याच १० ऑक्टोबर २०२५ रोजी महापालिकेत झालेल्या बैठकीत आ.संजय खोडके ,आ. सुलभाताई खोडके व महापालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या सकारात्मक चर्चा झाली. महानगर पालिकेने याबाबतचा प्रस्ताव माननीय जिल्हाधिकारी अमरावती यांचेकडे पाठविण्याबाबतची बैठकीत चर्चा करण्यात आली. तर दुसरीकडे भाजपा नेते खासदार डॉ. अनिल बोन्डे यांनी विकासाच्या नावावर हे ऐतिहासिक वैभव नष्ट होऊ नये, असे सांगून आज पत्रकार परिषद घेऊन विरोध दर्शविला आहे. .याबाबत आ. संजय खोडके यांनी आपली रोखठोक भूमिका व्यक्त करून नेहरू मैदानाच्या जागेवर शहर विकासाचे विविध प्रकल्प जनविकासाच्या दृष्टीने मार्गी लावण्यासंदर्भात पालकमंत्री ना. चंद्रशेखरजी बावनकुळे यांच्या बैठकीतच चर्चा करून तश्या सूचना निर्गमित करण्यात आल्या असल्याचे सांगितले आहे.

आ.संजय खोडके यांनी म्हटले आहे कि, जिल्ह्याचे पालकमंत्री ना. चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये गेल्या २६ सप्टेंबर २०२५ रोजी अमरावती महानगर पालिकेत आढावा बैठक पार पडली होती . त्या बैठकीबाबत महापालिकेच्या इतिवृत्त मधील मुद्दा क्रमांक १४ मध्ये नमूद विषयानुसार चडखऊ म्हणजेच महाराष्ट्र राज्य इन्फ्रन्सस्ट्रक्चर डेव्हलपमेंट कार्पोरेशन मार्फत अमरावती शहरातील विविध विकास कामे / प्रकल्पाची कामे करण्याच्या अनुषंगाने करारनामा करावा, असे पालकमंत्री महोदयांच्या वतीने निर्देश देण्यात आले. त्या बैठकीमध्ये नेहरू मैदान विकास , टाऊन हॉलचे नूतनीकरण व शहराकरिता मल्टीलेव्हल पार्किंग विकसित करणे, अमरावती महानगर पालिका नूतन प्रशासकीय इमारतीसाठी डीपीआर तयार करणेबाबतही पालकमंत्री ना.



बावनकुळे यांनी सुचना केल्यात.

शहराचे हृदयस्थळी असलेले नेहरू मैदान , टाऊन हॉल व लगतचा परिसर हा दुर्लक्षित असून तिथे कुठलीही सुविधा नाही. भविष्यात या जागेचा वापर एखाद्या चांगल्या कामासाठी किंवा विधायक कार्यासाठी होण्याचीही शक्यता नाही. तसेच कुठलेही नियोजन अथवा प्रावधान नाही आहे. उलट नेहरू मैदानचे विद्रुपीकरण झाले असून प्रचंड दुरावस्था झाली आहे. कुणी कसाही त्या जागेचा वापर करत आहे, अनेकांनी आपले ठिय्या मांडले आहेत.


अमरावती शहरात मध्यठिकाणी कुठलीही खुली जागा शिल्लक नाही. त्यामुळे नेहरू मैदान येथील जागेचा पर्याय हा मनपाच्या नूतन इमारतीसाठी उत्तम आहे. त्याठिकाणी नवीन प्रशासकीय इमारत झाल्याने सर्व दृष्टीने सुविधाजनक होणार आहे. याबाबत पालकमंत्री ना. बावनकुळे यांनी त्या बैठकीत दुजोरा दिला असल्याचे आ. खोडके यांनी सांगितले. त्याबरोबर टाऊन हॉलचे नूतनीकरण करणे आवश्यक आहे. जेणेकरून २००-३०० प्रेक्षक असलेले कार्यक्रम करण्याची सोय होईल व लहान कलावंतांना एक व्यासपीठ निर्माण होईल. तसेच लगतच्या खुल्या जागेवर अमरावती फोटोग्राफर असोसिएशनच्या जुन्या मागणी नुसार आर्ट गॅलरी निर्माण करण्यावर सुद्धा बैठकीत चर्चा करण्यात आली होती. सुप्रसिद्ध कविवर्य स्व. सुरेश भट हे आपल्या अमरावतीचे असल्याने त्यांच्या नावाने टाऊन हॉल व आर्ट गॅलरी साकारण्यात यावी. व त्यासाठी निधी मिळण्याला घेवून राज्याचा सांस्कृतिक कार्य विभागाकडे प्रस्ताव सादर करून त्या निधीतूनच टाऊन हॉल व आर्ट गॅलरी उभारण्यात यावे, असे सुद्धा पालकमंत्री ना. बावनकुळे यांच्या बैठकीत चर्चा करण्यात आली असल्याचे सुद्धा आ. संजय खोडके यांनी म्हटले आहे. परिसरातच मनपाची लाल शाळा आहे. ती बंद पडली आहे. त्याशाळेची डागडुजी व दुरुस्ती करून त्याला नवीन रूप देऊन ऐतीहासिक शाळेचे जतन करावे व म्युझियम साकारण्याची एक चांगली संकल्पना असून मनपात झालेल्या पालकमंत्री महोदयांच्या बैठकीतून समोर आली होती.

त्यानंतर पालकमंत्री ना. बावनकुळे यांच्या निर्देशांवरून चडखऊ अधिकारी व मनपा आयुक्त अमरावती यांच्यात चर्चा झाली असता , त्यानंतर चडखऊ च्या अधिकाऱ्यांनी महापालिकेच्या विविध विकास प्रकल्पांच्या अनुषंगाने शहरातील विविध जागांची पाहणी केली. अमरावती महानगर पालिकेच्या नूतन प्रशासनकीय इमारतीसाठी नेहरू मैदान येथील जागा हि अत्यंत सोयीची व चांगला पर्याय असल्याचा अभिप्राय अधिकाऱ्यांनी दिला. दरम्यान नुकत्याच झालेल्या १० ऑक्टोबर २०२५ रोजी मनपात बैठकीत चडखऊ चे अधिकाऱ्यांना सुद्धा पाचारण करण्यात आले असता त्यांनी नेहरू मैदान येथील जागेवर मनपाची नूतन प्रशासकीय इमारत बांधण्यास सर्व शहराच्या मध्यठिकाणी व सर्व शहवासीयांना सोयीची जागा होईल, असे सांगण्यात आले असता याबाबत डीपीआर तयार करून माननीय जिल्हाधिकारी अमरावती यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्याबाबत सुद्धा सकारात्मक चर्चा झाली असल्याचे आ.संजय खोडके यांनी सांगितले.अमरावती शहरातील अनेक विकासाचे मुद्दे या माध्यमातून सुटणार असून शहराला नवे वैभव प्राप्त होईल, त्यामुळे पालकमंत्री ना. चंद्रशेखरजी बावनकुळे यांच्या सुचनेवरून मनपा प्रशासनाने याबाबत हालचाली सुरु केल्या असतांना याला विरोध होणे हे खेदजनक असल्याचे आ.संजय खोडके यांनी म्हटले आहे.

# 'नो डिटेक्शन' अंजनगाव पोलीस स्टेशन डीबी बरखास्त

## अंजनगाव सुर्जी ठाणेदारांचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अंजनगाव सुर्जी** - वाढत्या गुन्हेगारी व अवैद्य धंद्यावर वचक ठेवण्यासाठी अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशनमध्ये काही दिवसांपूर्वी डीबी पथक नेमण्यात आले होते. परंतु नुकत्याच काही महिन्यापूर्वी नविन आलेले ठाणेदार यांनी ठाण्याच्या प्रभार घेतल्या पासून येणाऱ्या आपल्या पोलीस स्टेशनच्या हद्दीतील अभ्यास करून ठाणेदार सुरेश बोंडे यांनी



सदर डीबी पथक पूर्णपणे बरखास्त करण्याचे आदेश दिले आहेत.अंजनगाव सुजी पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या ४३ ते ४५ ग्रामीण गावे तसेच शहर यामध्ये होणारे अवैध व्यवसाय रोखण्याकरिता व कारवाई करण्याबाबत गस्त वाढवणे घरपोडी, चेन स्नेसिंग, सारख्या गुन्हे प्रकरणावर भर द्या अशा सूचना वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वारंवार केल्या होत्या तसेच दुचाकी चोरी, घरफोडी चे प्रमाण सुद्धा मोठ्या प्रमाणात अंजनगाव शहरात वाढले होते याबाबत ठाणेदार सदर डीबी पथकाच्या कामगिरी बाबत नाराजी व्यक्त होतीत्यामुळे सदर ठाणेदार सुरज बोंडे यांनी अंजनगाव पोलीस स्टेशन मधील डीबी पथक बरखास्त कले असल्याचे बोलले जात आहे.

**पोलीस स्टेशन मधील महत्वाचे डिपी पथक का?**-गुन्हे शाखेच्या पथकाशिवाय पोलीस स्टेशनच्या हद्दीत एकही जुगारअड्डा, सट्टापट्टी, अवैध दारू विक्री,किंवा क्रिकेट सट्टेबाजी सुरू होऊ शकत नाही. तसेच गांजाविक्री, अंमली पदार्थ विक्री किंवा जुगार अड्डा सुरू करायचा असल्यास स्थानिक पोलिस स्टेशनपेक्षा गुन्हे शाखेच्या या पथकात प्रत्येक पोलिस कर्मचाऱ्यांना वाटते आपली यानेमणूक व्हावी

### नव्या दमाच्या कर्मचाऱ्यांना डीपी मध्ये स्थान द्या

जर ठाणेदार यांनी नवीन डीबी पथक स्थापन केले तर त्या पथकामध्ये नवीन दमाच्या पोलीस कर्मचाऱ्यांना स्थान मिळावे अशी चर्चा शहरातील नागरिकांमध्ये रंगत आहे.

**प्रतिक्रिया**- डीबी पथक फक्त नावालेच होते. त्यांच्याकडून कोणत्याच प्रकारच्या कारवाई व गुन्हे उघडण्याची येत नसल्यामुळे डीबी पथक बरखास्त केले आहे.

**सुरज बोंडे,** ठाणेदार अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशन

# गोरगरिबांच्या घरात पुन्हा अंधार - आनंदाचा शिधा ठरला आठवणीतला सण..!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३तिवसा-** राज्य शासनाच्या वतीने काही वर्षांपासून सुरू असलेल्या आनंदाचा शिधा योजनेमुळे गोरगरिबांच्या घरात सणवाराच्या दिवसातही गोडधोडाचा सुगंध दरवळायचा. केवळ शंभर रुपयांत साखर, चणाडाळ, रवा आणि पानतेलाचा संच मिळाल्याने अनेक कुटुंबांची दिवाळी उजळायची. परंतु यंदाच्या वर्षी मात्र हा गोडवा हरवल्याचे चित्र दिसत आहे.गौरी-गणपती, नवरात्र, दसरा हे प्रमुख सण संपून आता दिवाळी दारात आली असताना देखील शासनाकडून आनंदाचा शिधा जाहीर करण्यात आलेला नाही. त्यामुळे तिवसा तालुक्यातील अनेक लाभार्थी निराश आहेत.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात सुरू झालेल्या या योजनेत शंभर रुपयांत चार ते पाच जिन्नसांचा संच दिला जात होता. साखर, रवा, चणाडाळ आणि खाद्यतेलामुळे गरिबांच्या घरात सणाच्या दिवशी गोडधोड बनायचे, लहान मुलांच्या चेहऱ्यावर आनंद उमटायचा. परंतु यंदा शासनाकडून कुठलीही घोषणा न झाल्याने गोरगरिबांची दिवाळी पुन्हा एकदा चिंतेत गेली आहे.तिवसा तालुक्यात स्वस्त धान्य लाभधारक कार्डधारक मोठ्या संख्येने आहेत.त्यापैकी - अंत्योदय कुटुंब धारक - ४,४०१ तर,




प्राधान्य कुटुंब कार्डधारक तब्बल ६७,२४७ लाभार्थी दिवाळीच्या गोडव्याची आतुरतेने वाट बघत आहेत. शासनाच्या या योजनेमुळे दरवर्षी सणांच्या काळात थोडाफार दिलासा मिळायचा; पण यंदा मात्र आनंदाचा शिधा गायब झाल्याने संताप आणि नाराजी व्यक्त होत आहे.गौरी-गणपती आणि नवरात्र संपून गेले, दसऱ्याचाही उत्सव पार पडला, तरी शासनाकडून शिधाबाबत कोणतीच घोषणा झाली नाही. त्यामुळे शासनानेच आनंदाचा शिधा विसरला काय? असा सवाल नागरिक विचारत आहेत.तिवसा तालुक्यातील अनेक लाभार्थ्यांनी सांगितले की, दिवाळी जवळ आली आहे, पण शासनाकडून काहीच हालचाल नाही. दरवर्षी आनंदाचा शिधा मिळाल्याने घरात गोडधोड करायला मिळायचे. पण यंदा शिधाच नाही, त्यामुळे सणाचा आनंदच हरवला आहे.राज्यभर या विषयावर चर्चा रंगली आहे. शासनाने तातडीने याबाबत निर्णय घेऊन सर्वसामान्य कुटुंबांना दिवाळीपूर्वी आनंदाचा शिधा द्यावा, अशी मागणी लाभार्थ्यांकडून होत आहे.नाहीतर आनंदाचा शिधा ही योजना आता फक्त आठवणीत उरेल, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

घर चालवताना रोजच्या गरजांची तारेवरची कसरत करावी लागते. अशा वेळी 'आनंदाचा शिधा' ही योजना म्हणजे थोडासा दिलासा होती. सणासुदीच्या काळात सरकारकडून मिळणारा तो आधार सर्वसामान्य कुटुंबांसाठी मोठा होता. पण यंदा योजना बंद झाल्याने मन खिन्न झालं आहे. सरकारने सर्वसामान्य कुटुंबांचा विचार करून हा निर्णय पुन्हा सुरू करावा.

**दादारावजी घोरमाडे, तळेगांव ठाकूर**

सरकारच्या चुकीच्या नियोजनाचा फटका थेट सर्वसामान्य जनतेला बसतोय. दिवाळी-दसऱ्यासारख्या आनंदाच्या सणावर मिळणारा आनंदाचा शिधा हा गरीब कुटुंबांसाठी सुखाचा किरण होता. पण निष्काळजीपणा आणि जबाबदारीचा अभाव यातून सरकारने तोच आनंद हिरावून घेतला. आज गोरगरिबांच्या ओठांवरील हास्य सरकारच्या निर्णयाने पुसलं आहे हे सरकार खरंच लोकांच्या हिताचं आहे का.

**वैभव वानखडेमाजी** नगराध्यक्ष तथा नगरसेवक न पं तिवसा

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सुरू केलेली आनंदाचा शिधा योजना समाजात स्वागतार्ह ठरली होती. सर्वसामान्य कुटुंबांना थोडा आधार मिळत होता. पण आता ती योजना थांबली असल्याने लोकांमध्ये नाराजी आहे. शासनाने या सणासुदीच्या काळात तरी पुन्हा आनंदाचा शिधा जाहीर करावा. गरीबांच्या घरातही सण साजरा व्हावा, हीच खरी दिवाळी. सगळ्यात महत्त्वाचे शंभर रुपयात मिळणारा शिधा घरातील सण थोडा उजळवायचा. यंदा मात्र काहीच हालचाल नाही.- **मंगला वि. शेंडे**, लाभार्थी, तिवसा

# सोयाबीनला खासगी बाजारात हमी भावापेक्षा दीड ते २ हजाराने कमी भाव

## सोयाबीनचा हमीभाव ५३२८ रुपये, तर खासगीत मिळतोय ३ ते ४ हजार रुपये



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती**

सद्य:स्थितीत खासगी बाजारात सोयाबीनला ३००० ते ४००० रुपये प्रतिक्विंटल असा मातीमोल भाव शेतकऱ्याला मिळत आहे. दुसरीकडे सोयाबीनचा हमीभाव ५ हजार ३२८ रुपये आहे. मात्र तो भाव मिळवण्यासाठी शासकीय खरेदी आवश्यक आहे. परंतु शासकीय केंद्र सुरू करण्याच्या हालचालीसुद्धा जिल्ह्यात अद्याप दिसत नाही. वास्तविक दिवाळीपूर्वी खरेदी केंद्र सुरू होणे अपेक्षित राहते. जिल्ह्यात या वर्षी अतिवृष्टीमुळे अनेक शेतकऱ्यांना तर सोयाबीनची कापणीच करावी लागली नाही. ज्या शेतकऱ्यांनी सोयाबीनची सोंगणी केली, त्यांना सरासरी प्रति एकर एक ते दोन क्विंटल सोयाबीन होत आहेत. त्यातही खासगी बाजारात मातीमोल भाव मिळत आहे. यंदा खरीप हंगामात जिल्ह्यातील ७० ते ८० टक्के शेतकऱ्यांना मशागत खर्चही वसूल होण्याची शक्यता नाही. अशावेळी शासनाकडून किमान शासकीय खरेदी केंद्र सुरू करून हमीभाव शेतकऱ्यांना देणे अपेक्षित होते. परंतु दिवाळी दहा दिवसांवर आली असतानाही शासकीय खरेदीची नोंदणीसुद्धा उर्वरित. पान ४ ओलावा कमी व्हावा म्हणून अनेक शेतकरी सोयाबीन काढल्यानंतर असे उन्हात वाळायला टाकत आहेत.

साठेबाज अन् काही व्यापाऱ्यांचाच फायदा होईल येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत दररोज ५ ते ६ क्विंटल सोयाबीन विक्रीसाठी येत आहे. या वर्षी अतिपावसामुळे सोयाबीनचा दर्जा दरवर्षीच्या तुलनेत काही प्रमाणात घसरला आहे. खासगी बाजारात सध्या सोयाबीनला मातीमोल भाव मिळत आहे. शनिवारी (दि. ११) प्रतिक्विंटल ३४०० रुपयांपासून ते अतिउत्तम दर्जाच्या सोयाबीनला केवळ ४ हजार १०० रुपये भाव मिळाला आहे. शासकीय खरेदी सुरू असती तर शेतकऱ्यांना आज क्विंटलमागे दीड ते दोन हजार रुपयांचा तोटा सहन करावा लागला नसता. बहुतांश शेतकऱ्यांकडून सोयाबीनची विक्री झाल्यानंतर महिना किंवा दीड महिन्याने खरेदी केंद्र सुरू झाल्यास त्या खरेदीचा फायदा केवळ सातबारा वापरून विक्री करणारे काही व्यावसायिक, साठेबाज आणि मोजके शेतकरी यांना होणार आहे.

### शासकीय खरेदी केंद्र सुरू करण्याच्या सूचना नाहीत

शासकीय खरेदी केंद्र किंवा नोंदणी सुरू करण्याबाबत कोणतेही आदेश अद्याप वरिष्ठांकडून प्राप्त झालेले नाहीत. मागील वर्षी जिल्ह्यात २१ खरेदी केंद्र होते. त्या केंद्रांची यादी यंदाही काही दिवसांपूर्वीच वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवली आहे. परंतु केंद्र सुरू करण्याबाबतचे आदेश मिळाले नाहीत. २० ऑक्टोबरपर्यंत केंद्र सुरू करण्याबाबत निर्णय होऊ शकतो.
–अजय बिसने, जिल्हा मार्केटिंग अधिकारी.

# पोषण योजनेचे अनुदान थकीत

## मुख्याध्यापकांच्या खिशावर 'मध्यान्ह भोजन'

### चार महिन्यांपासून इंधन व भाजीपाल्याचे पैसे न मिळाल्याने शिक्षण व्यवस्थापन अडचणीत

### दिवाळीपूर्वी निधी मिळावा अशी मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती :**

'प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजने'अंतर्गत शाळांमधील विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या मध्यान्ह भोजनासाठी लागणाऱ्या इंधन, भाजीपाला आणि पुरक आहारासाठीचे अनुदान मागील चार महिन्यांपासून थकीत आहे. यामुळे मुख्याध्यापकांना स्वखर्चाने हा खर्च उचलावा लागत असून, त्यांच्या आर्थिक अडचणी गंभीर होत चालल्या आहेत.राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था तसेच खाजगी अनुदानित शाळांमध्ये इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना या योजनेतून दररोज मध्यान्ह भोजन देण्यात येते. धान्याचा पुरवठा शासनाकडून केला जातो, परंतु इंधन, भाजीपाला आणि अंडीसारख्या पूरक आहारासाठी दर महिन्याला निधी शाळा व्यवस्थापन समितीला मिळतो.सद्यस्थितीत इयत्ता १ ली ते ५ वी साठी प्रती विद्यार्थी २.५९ तर इयत्ता ६ वी ते ८ वी साठी ३.८८ इतका निधी दिला जातो. पण जून २०२५ पासून आतापर्यंतचा निधी न मिळाल्याने या योजनेचा आर्थिक भार मुख्याध्यापकांच्या खिशावर पडत आहे.

### शासनाने तातडीने दखल घ्यावी – शिक्षक संघटनेची मागणी

या योजनेतील खर्च मुख्याध्यापकांनी स्वतःच्या खिशातून करत राहणे हे अन्यायकारक आहे. 'विद्यार्थ्यांच्या पोषणासाठीच्या योजनेचा निधीच जर थकीत असेल, तर या योजनेचा उद्देशच हरवेल', अशी भावना राजेश सावरकर, राज्य प्रसिद्धी प्रमुख, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती यांनी व्यक्त केली आहे.

### मागील वर्षी मिळाला होता अग्रीम निधी – यंदा मात्र थकबाकीच

मागील वर्षी शासनाने तीन महिन्यांचा अग्रीम निधी शाळांना दिला होता, त्यामुळे यंदाही अशीच अपेक्षा होती. परंतु यंदा ना अग्रीम निधी मिळाला, ना महिन्याचा नियमित खर्च. यामुळे मुख्याध्यापकांमध्ये असंतोषाचे वातावरण आहे.

### अंडी व केळी गायब!

मध्यान्ह भोजनात आठवड्यातून एक दिवस अंडी अथवा केळी देण्याची योजना गेल्या दोन वर्षांत सुरू होती. मात्र, यावर्षी या पूरक आहाराचा काहीही मागमूस दिसत नाही. यामुळे विद्यार्थी व पालक वर्गातही नाराजी आहे.

# अतिपावसाने बाधित ५.४८ लाख हेक्टरला पॅकेजमध्ये ठेंगा

## ४.९१ लाख शेतकऱ्यांना ५७० कोटी आवश्यक; पॅकेजमध्ये उल्लेख नाही

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती** सप्टेंबर महिन्यात अतिपावसाने शेतात पाणी साचून ४.९१ लाख शेतकऱ्यांची ५.४८ लाख हेक्टरमधील पिके बाधित झाली. यासाठी प्रचलित निकषाने ५७० कोटींची शासन मदत आवश्यक आहे. प्रत्यक्षात जाहीर विशेष मदतीच्या पॅकेजमध्ये या क्षेत्राचा उल्लेखही नाही. त्यामुळे या शेतकऱ्यांना मदतीऐवजी केवळ सवलती दिल्याने त्यांच्यात नाराजी आहे.

जिल्ह्यात ऑगस्ट महिन्यापासून सुरू झालेली पावसाची रिपरिप सप्टेंबरपर्यंत सुरू होती. यादरम्यान अनेकदा अतिवृष्टी झाल्याने शेताचे तलाव झाले.

त्यामुळे पिके पिवळी पडल्याने जाग्यावरच करपली. यामध्ये जी पिके वाचली, त्यांच्यावर बुरशीजन्य 'मर' रोगाचा अटॅक झाला. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले.

अशा परिस्थितीत २६ सप्टेंबरला जिल्हा परिषदेत राज्याचे महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आढावा बैठक घेतली. यावेळी उपस्थित आमदारांनी याबाबत पालकमंत्र्यांचे लक्ष वेधले असता त्यांनी सरसकट पिकांच्या पंचनाम्याचे आदेश कृषी व महसूल विभागाला दिले होते.याबाबतचा संयुक्त स्वाक्षरी अहवाल विशेष बाब म्हणून ९ ऑक्टोबरला शासनाला सादर झाला.

प्रत्यक्षात १० ऑक्टोबरला जाहीर शासनादेशात क्षेत्र डावलण्यात आल्याचे वास्तव आहे.

### जिरायती पिकांचे सर्वाधिक नुकसान

सप्टेंबर महिन्यात अतिपावसाने १,५८,५४५ हेक्टरवरील सोयाबीन पिकाचे, ८१,२०१ हेक्टरवरील तूर पिकाचे, १,८४,३७१ हेक्टरवरील कपाशी पिकाचे, २६६ हेक्टर मूग, २७६० हेक्टर ज्वारी, ११ हेक्टर उडीद, ४,७७९ हेक्टर धान, ३५,८०० हेक्टर मका व इतर ३६१२ हेक्टरमधील पिकांचे नुकसान झाले. याशिवाय ७१ हजार हेक्टरमधील संत्रा, ३८१ हेक्टरमधील मोसंबी, ६६ हेक्टरमधील लिंबू पिकाचे ३३ टक्क्यांवर नुकसान झालेले आहे.–

# रेशनचा तांदुळ वाहून नेणारा ट्रक पकडला ?

## चौकशी पूर्ण होईपर्यंत ट्रक तहसील गोडाऊनमध्ये राहणार जमा



**विदर्भ प्रजासत्ताकदि.१३वरुड,** वरुड शहरातील सातपुडा जिनिंग परिसरातून मोठ्या प्रमाणात तांदुळाने भरलेला दहा चक्का ट्रक तहसील कार्यालयाच्या कर्मचार्यांनी जप्त केल्याने शहरात खळबळ उडाली आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये विविध चांना उधाण आले आहे. ट्रकमध्ये रेशनचा तांदुळ असल्याचा संशय व्यक्त केल्या जात आहे.मिळालेल्या माहितीनुसार, तहसील प्रशासनाला गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. संबंधित ट्रक तांदुळाने पूर्ण भरलेला होता. चौकशीदरम्यान ट्रक चालकाने सांगितले की, हा तांदळाचा माल कोंढाळी येथील असल्याचे चालकाने सांगितले. मात्र,त्यासंबंधी प्राथमिक स्वरूपात अधिकृत कागदपत्रे सादर करण्यात आलेली आहे. ती कागदपत्रे बरोबर आहे, की बनावट आहे याची चौकशी सुरू आहे, तोपर्यंत महसूल विभागाने हा माल संशयित धरत ट्रक जप्तकेला आहे. तपासणी अंती सर्व कागदपत्रे बरोबर आढळल्यास हा ट्रक सोडून देण्यात येणार असल्याचे बोलल्या जात आहे.

**काय म्हणाले तपास अधिकारी**

तपास अधिकारी निखील नलावडे यांनी सांगितले की, सदर तांदूळ वाहतुकीबाबत प्राथमिक चौकशी सुरू असून, संबंधित मालाची खातरजमा केल्यानंतरच पुढील कार्यवाही केली जाईल. चौकशी पूर्ण होईपर्यंत ट्रक तहसील कार्यालयाच्या गोडाऊनमध्ये ठेवण्यात आला आहे. दरम्यान, संबंधित व्यापारी किंवा वाहतूकदार याच्याविरुद्ध अद्याप कोणताही गुन्हा नोंद झालेला नाही. महसूल विभाग या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करत असून तांदूळ सरकारी योजनेचा आहे की खासगी व्यवहारातील, याबाबत तपास सुरू आहे.

**योगायोग म्हणावा वस्तुस्थिती**

हा ट्रक शहरातील सातपुडा जिनिंगच्या परिसरात आढळून आला, दुसरा प्रकार म्हणजे हा ट्रकही पंडीत ट्रान्सपोर्ट, वरुड चा आहे. आणि ज्या सातपुडा जिनिंगमध्ये हा ट्रक आढळून आला, ते जिनिंग लोकेश अग्रवाल यांनी भाडेतत्वावर घेतल्याची माहिती आहे, आणि योगायोग म्हणावा, यापुर्वी लोकेश अग्रवाल यांच्यावर अवैध धान्याची तस्करी केल्याचा गुन्हासुध्दा दाखल आहे. या घटनेमुळे शहरात आणि परिसरात चर्चांना उधाण आले असून, अवैध साठेबाजी किंवा तांदूळ तस्करीचा प्रयत्न होता का, याबाबत प्रशासनाकडून लवकरच अधिकृत माहिती येण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# शहर पोलिसांचे जम्बो कोम्बिंग ऑपरेशन२० गुन्हेगारांना अटक, रेकॉर्डवरील आरोपिंना ही फटकारले



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती : –** आगामी दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर, शहरातील कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस आयुक्त अरविद चावरिया यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात कोम्बिग ऑपरेशन राबवण्यात आले. सर्व १० पोलिस स्टेशन हद्दीतील पोलिसांनी रेकॉर्ड वरील आरोपींच्या घरांचे दरवाजे ठोठावत झडती घेतली. अनेक गुन्हेगारांना पकडून त्यांना फटकारण्यात आले. कोणताही गुन्हेगार पळून जाऊ नये यासाठी पोलिसांनी शहरातील बहुतेक भागात छापे टाकले. परिणामी, पोलिसांनी एक-दोन नव्हे तर २० आरोपींना अटक केली आणि त्यांच्याविरुद्ध संबंधित पोलिस ठाण्यांमध्ये विविध कलमांखाली गुन्हे दाखल केले.रात्री उशिरा सुरू झालेले हे कोम्बिंग ऑपरेशन सकाळी ६ वाजेपर्यंत सुरू राहिले. यादरम्यान, चाकू घेऊन दहशत निर्माण करणारे आरोपी सुमित आनंद आडोळे (२, संजय गांधी नगर), विशाल गंगाराम कवाटे (२९, महाजनपुरा), संतोष सुभाषराव येरपुडे (१८, फ्रेझरपुरा) यांना पकडण्यात आले आणि त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. दुसरीकडे, अमरावती जिल्ह्यातून तडीपार आरोपींपैकी भरत राजेश मगरे (२४, इंदिरा नगर, बडनेरा), विशाल गंगाराम कवाटे (२९महाजनपुरा), विकी मधुकर खडसे (३०, केडिया नगर) यांना ताब्यात घेण्यात आले. महाराष्ट्र पोलिस कायद्यानुसारचोरीच्या उद्देशाने फिरणाऱ्या अभिषेक उर्फ टोबो आनंदिला साहू (२२, साहुबाग)याच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली. विविध अवैध जुगार अड्ड्यांवर छापे टाकत असताना आरोपी युसूफ खान युनूस खान (६०, बडनेरा), अब्दुल सत्तार अब्दुल खलील (कंपासपुरा बडनेरा), राजू बारकुजी सांगोळे (६४, नवसारी), आसिफ खान मुस्तफा खान (५२, अलहिलाल कॉलनी), संजय रमेशराव गावंडे (अब्दुल हुसेन ८, नवसारी), अब्दुल हुसेन गावंडे (६४, नवसारी) यांना अटक केली. उत्तमराव कोकाटे (४९, महात्मा फुले नगर), संदीप श्रावणइंगळे (४५, नवसारी) यांना रंगेहात पकडण्यात आले.

आरोपी प्रशांत अशोकराव गणवीर (४१, उत्तम नगर), सागर पंजाबराव लोखंडे (३८, सिद्धार्थनगर), बाबूलाल हसन रेलिवाले (५८, कुंभारवाडा), रुखसाना युसूफ गोचेवाले (२१, फ्रेजरपुरा), बाळू उत्तमराव जुनघरे (६०, महापुरुष) यांना दारु विक्री प्रकरणी ताब्यात घेतले. अनेक महिने फरार असलेला आरोपी श्रवण रवी वासनिक (२१, कैलाश नगर महादेख खोरी) याला अटक करण्यात आली आहे. अटककेलेल्या सर्व आरोपींविरुद्ध संबंधित पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.–

# स्व.जानरावजी ईखे स्मृतिप्रीत्यर्थ शालेय साहित्य वाटप



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती –** श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सभासद दिवंगत स्व .जानरावजी ईखे यांच्या स्मृतिपित्यर्थ आज श्रद्धानंद मुलींचे वसतिगृह येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.दिवाळी सणाचे औचित्य साधून ईखे परिवारातर्फे गेल्या तीन वर्षापासून विद्यार्थ्यांना मीष्टांन व शालेय साहित्याची वाटप करण्यात येते. यावर्षी जानरावजी ईखे यांच्या स्मृतिपित्यर्थ श्रद्धानंद मुलींचे वसतिगृह येथील विद्यार्थिनींना साहित्य वाटप करण्यात आले. समाजामध्ये राहत असताना आपण सामाजिक बांधिलकी जपत काहीतरी करावे या उद्देशाने दरवर्षी विविध प्रकारचे सामाजिक उपक्रम राबवत असतो.गेल्या तीन वर्षापासून श्रद्धानंद मुलींचे वसतिगृह येथे होतकरू विद्यार्थिनींना मदत करण्याचे कार्य आम्ही करत आहोत. यापुढेही विद्यार्थ्यांना जे आवश्यक असेल ते साहित्य देण्याचा मानस याप्रसंगी बोलताना आशिष ईखे यांनी व्यक्त केला.यावेळी झालेल्या छोट्याखाणी कार्यक्रमाला श्रीमती सुशीला ईखे,आशिष ईखे प्रणाली ईखे, सुनिता दापूरकर, प्रा.नितीन कपले, अधीक्षक ठाकरे मॅडम, शिक्षक ,कर्मचारी आणि विद्यार्थिनींची मोठ्या संख्येने उपस्थित होती

# शकुंतला रेल बचाव समितीची ३७ वी आढावा बैठक

## दिवाळीपूर्व रेल्वे स्टेशनवर आशेचे दिवे लावून जनआंदोलनाची तयारी



**विदर्भ प्रजासत्ताकदि.१३अचलपूर** ब्रॉडगेज प्रकल्पाच्या डीपीआरला गती मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर शकुंतला रेल्वे बचाव सत्याग्रह समितीची ३७ वी आढावा बैठक आज साक्षी इन्फोटेक येथे पार पडली. शकुंतला झुक झुक गाडी लवकरच एक्सप्रेस होईल या सामूहिक आशावादासह आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार या बैठकीत करण्यात आला.


येत्या २० ऑक्टोबर रोजी, दिवाळीच्या पूर्वसंध्येला प्रतीकात्मक जनआंदोलनाच्या माध्यमातून अचलपूर रेल्वे स्टेशन परिसरात विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात येणार आहेत. यामध्ये स्वच्छता अभियान, दिवाळी फराळ वाटप, मुलांसोबत आतिषबाजी आणि शेकडो दिव्यांनी रेल्वे स्थानक उजळून टाकण्याचा कार्यक्रम समाविष्ट आहे.

बैठकीस शहरातील विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी आणि सत्याग्रही मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये योगेश खानजोडे, डॉ. राजा धर्माधिकारी, राजेश अग्रवाल, दीपा तायडे, राजकुमार बर्डिया, संजय डोंगरे, शंकर बारखडे, प्यारेलाल प्रजापती, राजेन्द्र जयसवाल, पंकज गुप्ता, राजेश पांडे, दयाराम चंदेले, उज्ज्वला माकोडे, मुरलीधर ठाकरे, कवि उज्ज्वल अग्रवाल, आकाश श्रीवास्तव यांचा समावेश होता.कार्यक्रमानुसार, २० ऑक्टोबर रोजी सायंकाळी ४ वाजता रेल्वे स्टेशन परिसरात स्वच्छता मोहिम राबवली जाणार असून, त्यानंतर प्रवाशांना आणि स्थानिक नागरिकांना दिवाळी फराळ वाटप करण्यात येईल. सायं. ६ वाजता शेकडो सत्याग्रहींच्या हस्ते आशेचे दिवे प्रज्वलित करून दिवाळीचा जल्लोष साजरा केला जाईल.सत्याग्रही पदाधिकाऱ्यांनी सर्व नागरिकांना या सामाजिक उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

# शेतकऱ्यांसाठी मदतीचा हात

हनुमान चालिसा चॅरिटेबल ट्रस्ट व परंपरा ग्रुपतर्फे

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी २१ लाखांचा धनादेश सुपूर्द




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

नुकत्याच झालेल्या नवरात्रोत्सवात परंपरा ग्रुपद्वारा आयोजित अंबाकुंभ रासगरबा कार्यक्रमात शेतकऱ्यांना मदतीचं दिलेलं वचन पूर्ण करत हनुमान चालिसा चॅरिटेबल ट्रस्ट व परंपरा ग्रुपने २१ लाख रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी सुपूर्द केला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हा धनादेश प्रदान करण्यात आला.

या प्रसंगी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, आमदार रवि राणा आणि भाजपा नेत्या खासदार नवनीत राणा हे मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रातील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी ३१६२८ कोटी रुपयांचे भरीव पॅकेज जाहीर केले आहे. यासंदर्भात बोलताना आमदार रवि राणा म्हणाले, निसर्गाने साथ दिली नाही, पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मदतीचा हात दिला.

या उपक्रमात सहभागी झालेल्या संस्था, आयोजक व कार्यकर्त्यांचे मुख्यमंत्र्यांनी विशेष कौतुक केले. अंबाकुंभ रासगरबा कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक अनुपमा राणा, स्नेहल गुल्हाणे, सिमरन बजाज, नितु गोयनका यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

## प्रवीण पोटे पाटील यांच्याकडून

# पूरग्रस्तांसाठी तीन ट्रक मदतीचे सामान रवाना

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून रवाना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ अमरावती –** मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात यंदा झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक जिल्ह्यांत पूरपरिस्थिती निर्माण झाली. शेकडो घरं जमीनदोस्त झाली, नागरिकांचं जनजीवन विस्कळीत झालं. अशा संकटग्रस्त पूरग्रस्त कुटुंबीयांसाठी माजी मंत्री प्रवीण पोटे पाटील यांनी पुढाकार घेत आज धाराशिव जिल्ह्यातील पूरग्रस्तांसाठी तीन ट्रक अन्नधान्य व किराणा साहित्य पाठवले.

या उपक्रमाला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.ना. देवेंद्र फडणवीस यांनी हिरवी झेंडी दाखवून मदतीच्या ट्रकना धाराशिवच्या दिशेने रवाना केले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी या उपक्रमाचं कौतुक करताना म्हटलं की, अशा संकटाच्या काळात समाजातील प्रत्येकाने आपआपल्या परीने मदतीचा




हात पुढे करणे गरजेचे आहे. पोटे पाटील यांनी दिलेली ही मदत गरजूंपर्यंत पोहोचेल आणि त्यांना दिलासा मिळेल.

पूरग्रस्त भागातील जनतेवर मोठं संकट ओढावलं आहे. ही केवळ मदत नसून आपुलकीची भावना आहे. ही केवळ सुरुवात आहे. गरज भासल्यास आणखी मदत दिली जाईल,

असे माजी मंत्री प्रवीण पोटे पाटील यांनी सांगितले.

# चालत्या रेल्वे मधून २.३० किलो सोनेची लंपास

### बडनेरा रेल्वे स्थानकावर धक्कादायक चोरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३बडनेरा –** रविवारी संध्याकाळी सुमारे ७ वाजता बडनेरा रेल्वे स्थानकावर एक धक्कादायक घटना घडल्याचे उघडकीस आले बडनेरा रेल्वे स्थानकावरून जळगाव कडे निघालेल्या सराफा व्यापाऱ्याच्या बॅगेतील तब्बल २ किलो ३०० ग्रॅम सोने अज्ञात व्यक्तीने चोरून नेले.सराफा व्यापारी किशोर वर्मा हे दीपावलीच्या पार्श्वभूमीवर रविवारी सकाळी जळगाव वरून अमरावतीमध्ये व्यापाऱ्यांना दागिने दाखवण्यासाठी आले होते. दिवसभर व्यापार्यांना दागिने दाखवून आणि ऑर्डर घेऊन सायंकाळी ते हावडा-मुंबई मेलने जळगावला परत जाण्यासाठी बडनेरा स्थानकावर पोहोचले.

ट्रेनमध्ये चढताच त्यांची दागिन्यांनी भरलेली बॅग अचानक



गायब झालेली त्यांच्या लक्षात आले . बॅगमध्ये २.३० किलो सोने होते. घटनेची माहिती वर्मा यांनी तात्काळ दिली त्यानंतर रेल्वे पोलीस स्टेशन, बडनेरा येथे तक्रार दाखल केली.रेल्वे पोलीसांनी स्थानकाच्या आतील व बाहेरील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे. मात्र, अद्याप चोरट्याचा थांगपत्ता लागलेला नाही.या धाडसी चोरीमुळे अमरावतीतील सराफा व्यवसायामध्ये प्रचंड खळबळ माजली आहे. व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. रेल्वे पोलीस या घटनेचा तपास करत आहेत.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अमरावती बेलोरा विमानतळावर स्वागत







मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आज दुपारी १२ वाजता अमरावती विमानतळ येथे आगमन झाले. त्यांच्यासमवेत पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे होते.

मुख्ममंत्री श्री. फडणवीस यांचे आगमन झाल्यानंतर विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल, विशेष पोलिस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, मनपा आयुक्त सौम्या शर्मा, पोलिस आयुक्त अरविंद चावरीया, जिल्हा पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी त्यांचे स्वागत केले. त्यानंतर मुख्यमंत्री नियोजित कार्यक्रमासाठी रवाना झाले.

### भाजपा मोठा भाऊ – युवा स्वाभिमान पार्टीचा संकल्प

# अमरावतीतील आढावा बैठकीत निवडणुकीच्या तयारीला जोर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

अमरावती महानगर पालिका, जिल्हा परिषद, नगर परिषद, नगर पंचायत व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर युवा स्वाभिमान पार्टीच्या राजापेठ येथील मुख्य कार्यालयात भव्य आढावा बैठक पार पडली.या बैठकीत युवा स्वाभिमान पार्टीने भारतीय जनता पक्षासोबत गठबंधन जाहीर करत भाजपा हा आमचा मोठा भाऊ असून, लहान भाऊ म्हणून आम्ही पूर्ण ताकदीने सोबत राहू, असा निर्धार व्यक्त केला.बैठकीत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष निळकंठराव कात्रे, मार्गदर्शक सुनील राणा, कोषाध्यक्ष शैलेन्द्र कस्तुरे, जयंतराव वानखडे, राष्ट्रीय उपाध्यक्ष ॲड. नंदेश अंबाडकर, जिल्हाध्यक्ष अजय देशमुख, प्रा. अजय गाडे, हरीश चरपे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

भाजपाचा जिल्हा परिषद अध्यक्ष व महापौरच राहील, असा विश्वास या वेळी व्यक्त करण्यात आला. शहर व ग्रामीण भागातील विकासकामांचा प्रचार आणि जनसंपर्क वाढवण्याच्या सूचनाही पदाधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने दिलेल्या ३१६२८ कोटींच्या मदतीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विशेष आभार मानण्यात आले.

यावेळी मोठ्या संख्येने कार्यकर्ते आणि पदाधिकारी उपस्थित होते. आगामी निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांनी आपल्या प्रभागात जनतेच्या संपर्कात राहून समस्या सोडवण्यावर भर देण्याचे आवाहन करण्यात आले.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दोन लाख कुटुंबांना किराणा व साडी-चुडी वाटपाचा भव्य शुभारंभ

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.१३अमरावती –** आज सोमवार, दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ रोजी अमरावती दौऱ्यावर असताना महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री मा.ना. देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते, दिवाळीच्या पार्श्वभूमीवर २ लाख कुटुंबांना किराणा वाटप आणि भगिनींना साडी-चुडी वाटप उपक्रमाचा भव्य शुभारंभ करण्यात आला.

हा उपक्रम आ. रवीभाऊ राणा व मा.सौ. नवनीत राणा, माजी खासदार अमरावती लोकसभा क्षेत्र यांच्या संकल्पनेतून, युवा स्वाभिमान पार्टी व भारतीय जनता पार्टी यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत आहे.दिवाळीच्या सणानिमित्त शेतकरी, शेतमजूर, गोरगरीब व कष्टकरी जनतेसाठी हा उपक्रम राबविण्यात येत असून, राज्यातील गावागावांत व शहरांतील प्रत्येक कुटुंबाच्या घरी



हा किराणा पोहोचविण्यात येणार आहे. अनेक ठिकाणी या वाटपाची सुरुवातही झाली आहे.

कार्यक्रमास अमरावतीचे पालकमंत्री मा. चंद्रशेखर बावनकुळे, भाजपा प्रदेशाध्यक्ष मा. रविंद्र चव्हाण, राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे, आ. केवलराम काळे (मेळघाट), आ. प्रवीण तायडे (अचलपूर), आ. चंदूभाऊ यावलकर (मोर्शी), आ. राजेशभाऊ वानखडे (तिवसा), भाजपा शहराध्यक्ष नितीन धांडे, युवा स्वाभिमान पार्टीचे मार्गदर्शक मा. सुनीलभाऊ राणा, तसेच भाजपा व युवा स्वाभिमान पार्टीचे हजारो कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अमरावतीत दिवाळी आनंदोत्सव व फोटोग्राफी प्रदर्शनासाठी जोरदार तयारी

## आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांची सांस्कृतिक भवनाला भेट, नियोजनाबाबत महत्त्वपूर्ण निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती–**

अमरावती महानगरपालिकेतर्फे १६ ते २१ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत सांस्कृतिक भवन, अमरावती येथे आयोजित करण्यात येणाऱ्या दिवाळी आनंदोत्सव व फोटोग्राफी प्रदर्शन या भव्य उपक्रमाची तयारी अंतिम टप्प्यात आली असून, या पार्श्वभूमीवर महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आज १३ ऑक्टोबर रोजी सांस्कृतिक भवनाला भेट देऊन सखोल पाहणी केली.

पाहणी दरम्यान त्यांनी संबंधित अधिकारी, अभियंते आणि विभाग प्रमुखांशी संवाद साधून नियोजनाची माहिती घेतली. कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा आढावा घेत सुरक्षा, स्वच्छता, प्रकाशयोजना, वाहतूक व पार्किंग व्यवस्था याबाबत स्पष्ट व महत्वाचे निर्देश दिले.

आयुक्त म्हणाल्या, हा उत्सव केवळ एक सांस्कृतिक उपक्रम नसून, तो शहरातील कला, संस्कृती आणि सामाजिक एकतेचं प्रतीक ठरेल. त्यामुळे नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असून, संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध आणि सर्वसमावेशक व्हावा.

**उत्सवाची वैशिष्ट्ये:**

या आनंदोत्सवात फोटोग्राफी प्रदर्शनात शहरातील छायाचित्रकारांच्या उत्कृष्ट



कलाकृती, बचत गटांचे स्टॉल्स, स्थानिक उद्योजकांची उत्पादने, हस्तकला वस्तू, खाद्यपदार्थ, सांस्कृतिक कार्यक्रम, तसेच मुलांसाठी मनोरंजनपर उपक्रम हे विशेष आकर्षण ठरणार आहेत.

महानगरपालिकेच्या या उपक्रमात विधिमंत्र संस्था सहसंयोजक म्हणून सहभागी झाली असून, व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे पार पडेल असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी यावेळी परिसर आकर्षक पद्धतीने सजविणे, सुरक्षितता उपाययोजना, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, वाहनतळाची सुविधा याबाबतही सूचना दिल्या.

यावेळी उपायुक्त योगेश पिठे, सहाय्यक आयुक्त भूषण पुसतकर, धनंजय शिंदे, बाजार परवाना विभागाचे दिपक खडेकार, उदय चव्हाण, छणङ्च् विभागाचे व्यवस्थापक भूषण बाळे, देवदत्त कुलकर्णी, सांस्कृतिक भवनचे व्यवस्थापक व कार्यक्रम संयोजक उपस्थित होते.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत